Dear friends,

Greetings from IDOL!

We are happy to inform you that IDOL extended its Library. We cordially welcome everyone to become a member of our Library, keeping in mind the aim of encouraging reading amongst the students, teaching, non-teaching staff (permanent, temporary), as well as campus residents.

1. The Reader can become a member by depositing Rs.500/- and a Registration Fee of Rs.100/-.
2. Membership will be free for the current IDOL students (till their admission is valid).
3. The library facility will be available on all Working Days. (Monday to Friday, 1st, 3rd and 5th Saturday) between 11 a.m. to 4 p.m.

Membership fee of Rs.100/- (one time not refundable) Deposit Rs.500/- (refundable at the time of discontinuation of readership). Share the facilities share the pleasure. Please join the Library of IDOL.

Regards,

(Ambuja Salgaonkar)
I/c. Director

नमस्कार

आपणा सर्वांना दिवाळीच्यानिमित्याने खूप खूप शुभेच्छा आणि त्यासोबतच एक छानशी वार्ताभेट...

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त शिक्षण विभागाच्या (आयडॉल) ग्रंथालयातील विविध पुस्तके आता आपण घरी नेऊन वाचू शकाल. ही सुविधा विभागाचे विद्यार्थी तसेच इतरही, मुंबई विद्यापीठाशी संलग्न अशा प्रत्येक इच्छुकांसाठी उपलब्ध आहे. खालील नियमाधीन राहून तिचा आपण जरूर लाभ घ्यावा.

१. दिनांक १० नोव्हेंबर २०१५ पासून ही सुविधा सोमवार ते शुक्रवार तसेच पहिला, तिसरा व पाचवा शनिवार या दिवसांमध्ये सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० या कालावधीत उपलब्ध असेल. इच्छुक वाचकांनी रु १००/- नोंदणी फी व रु ५००/- अनामत रक्कम भरून ग्रंथालयाचे सदस्यत्व घ्यावे. चालू वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या दूर व मुक्त शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा मोफत असेल.

२. एका वेळी प्रत्येक सदस्याच्या नावे दोन पुस्तके घेता येतील.

३. सदस्याने घरी नेलेले प्रत्येक पुस्तक एका आठवड्यात परत करणे बंधनकारक आहे. एक पुस्तक लागोपाठ जास्तीत जास्त दुसऱ्या आठवड्यात घेता येईल. त्यापुढील पंधरा दिवसांसाठी दर दिवशी रू २/- याप्रमाणे दंड भरून ते पुस्तक सदस्यास स्वत:कडे ठेवण्यास उपलब्ध असेल. प्रत्येक पुस्तक जास्तीत जास्त एक महिन्याभरात परत करून अधिकाधिक वाचकांस विविध पुस्तकांचा लाभ घेण्यास सहकार्य करावे.

४. पुस्तक फाटल्यास वा हरवल्यास तसे लेखी कळवणे बंधनकारक आहे. अशावेळी पुस्तकाची नवी प्रत वा पुस्तकाच्या किंमतीच्या दिडपट इतकी दंड आकारणी सदस्यावर बंधनकारक असेल.

५. प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचा शैक्षणिक कालावधी संपल्यानंतर तसेच विद्यापीठाशी संलग्न अशा इतर सदस्यांनी स्वत:ची विद्यापीठ-संलग्नता संपुष्टात येत असताना आयडॉल ग्रंथालयातून ना हरकत प्रमाणपत्र घेणे सक्तीचे आहे. आपण आपली अमानत रक्कम ना हरकत प्रमाणपत्रासोबत वा तद्नंतर एकवर्षात अर्ज करून परत मिळवू शकता.

६. सदस्यांनी प्रत्येक वर्षी आपल्या सदस्यत्वाची मोफत पुनर्नोंदणी करून आयडॉलग्रंथालयाकडील स्वत:ची माहिती अद्यावत ठेवण्यास सहकार्य करावे.

कळावे,

आपले नम्र,

आयडॉल ग्रंथालयचालक